शासनाकरीता नक्षलविरोधी अभियानाकरीता खरेदी करण्यात येणा-या H १४५ या नवीन हेलिकॉप्टरच्या प्रशिक्षणाकरीता विमानचालन संचालनालयातील तीन वैमानिकांना पाठविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.विचासं-१११८/१ /प्र.क्र.८०/२८-अ,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक : १५ एप्रिल, २०१९.

<u>वाचा</u> : १) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.विचासं-१११८/प्र.क्र.३५/२८-अ, दि.२३ एप्रिल,२०१८ अन्वये निर्गमित करण्यात आलेले मा.शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.०४.२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.विचासं-१११८/ प्र.क्र.८०/२८-अ, दिनांक ८/५/२०१८

३) विमानचालन संचालनालयाचे पत्र क्र.डीए/एडीएम/४१७/२०१९, दिनांक २ एप्रिल, २०१९.

<u>प्रस्तावना</u> :

संदर्भ क्र.२ नुसार महाराष्ट्र शासनाकरीता नक्षलविरोधी अभियानाकरीता नागपूर येथे स्थित करण्यासाठी फ्रान्स येथील "एअरबस हेलिकॉप्टर" या उत्पादक कंपनीकडून H१४५ हे बहुउद्देशिय नविन हेलिकॉप्टर खरेदी करण्याचा निर्णय घेण्यात आला. एअरबस या कंपनीबरोबर केलेल्या निविदा प्रक्रियेतील विहित अटी व शर्तीनुसार तसेच त्यांच्यासोबत झालेल्या करारातील तरतूदीनुसार कंपनीकडून शासकीय वैमानिकांना DGCA/EASA मान्यताप्राप्त प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानुसार विमानचालन संचालनालयातील वैमानिकांना उजळणी प्रशिक्षणासाठी परदेशी पाठविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

विमानचालन संचालनालयातील खालील नमुद वैमानिकांना H१४५ या हेलिकॉप्टरच्या प्रशिक्षणासाठी त्यांच्या नावापुढे नमुद केलेल्या कालावधीमध्ये प्रशिक्षणासाठी परदेशी जाण्यासाठी तसेच प्रवासाकरीता दि.३/६/२०१९ रोजी मुख्यालय सोडण्याची शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

अ क्र.	वैमानिकाचे नाव व पदनाम	प्रशिक्षणाचा दिनांक	प्रशिक्षणाचा कालावधी	प्रशिक्षणाचे ठिकाण
१	कॅ.संजय कर्वे, मुख्य वैमानिक	०५/०६/२०१९ ते १४/८/२०१९	७५ दिवस	डोनावर्थ/मॅनचींग, जर्मनी
२	कॅ.महेंद्र दळवी, वरिष्ठ वैमानिक	०५/०६/२०१९ ते १४/८/२०१९	७५ दिवस	डोनावर्थ/मॅनचींग, जर्मनी
३	कॅ.मोहित शर्मा,सह वैमानिक	०५/०६/२०१९ ते १४/८/२०१९	७५ दिवस	डोनावर्थ/मॅनचींग, जर्मनी

२. उपरोक्त प्रशिक्षणासाठीच्या खर्चाचे विस्तृत परिशिष्ट १ यासोबत जोडण्यात आले आहे.

३. सदर प्रशिक्षणासाठी एकूण तीन वैमानिकांचा जर्मनी येथील प्रवास खर्च (टॅक्सी), निवास खर्च, दैनिक भत्ता व इतर कर (युरोमध्ये) आणि प्रवास खर्च (विमान), प्रवास विमा, व व्हीसा खर्च (रुपयात) असा एकूण युरो ६९,४४९.५५ (प्रचलित दरानुसार) + रु.७,३०,५००/- खर्च येणार आहे. हा खालील लेखाशीर्षाखालील सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा व त्याच उपलेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

मागणी क्र ए-४,
"२०७०-इतर प्रशासनिक सेवा
(००) (११४) परिवहन साधनांची खरेदी व परिरक्षण
(००) (०२) विमानचालन सल्लागार, महाराष्ट्र शासन
(२०७० ०१५६) ११-प्रवास खर्च

४. या प्रित्यर्थ उप संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" म्हणून व संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय विमानचालन संचालनालयाशी संबंधित मा.मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६ एप्रिल, २०१८ च्या बैठकीतील मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०४१५१५२४०७०२०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e645645466613634 00c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, ou=GAD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2019.04.15 15:43:59 +05'30'

(ब.भु.गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

सोबत : परिशिष्ट १

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई ५६.
३. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई ५६.
४. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. महालेखापाल, (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. सामान्य प्रशासन विभाग /कार्या.२५, मंत्रालय, मुंबई ३२.
९. निवड नस्ती.

परिशिष्ट १

राज्य शासनाच्या हेलिकॉप्टर वरील वैमानिकाच्या डोनावर्थ/मॅनचींग,जर्मनी येथील प्रशिक्षणासाठी लागणाऱ्या खर्चाचे विस्तृत विवरणपत्र

खर्चाची बाब	प्रति वैमानिक खर्च	तीन वैमानिकांच्या प्रशिक्षणासाठी येणारा एकूण खर्च
प्रवास खर्च (विमान तिकीटे)	रु.२,२१,०००/- अथवा प्रत्यक्ष खर्च (जो कमी असल तो)	रु.६,६३,०००/-
प्रवास विमा	रु.१५,०००/- अथवा प्रत्यक्ष खर्च (जो कमी असेल तो)	रु.४५,०००/-
व्हीसा खर्च	रु.७,५००/- अथवा प्रत्यक्ष खर्च (जो कमी असेल तो)	रु.२२,५००/-
जर्मनीमधील प्रवास खर्च (टॅक्सी)	एकूण दिवस ७३= **Euro** ३८३०	Euro ११४९०
निवास खर्च	**Euro** ८९.५० प्रति दिवस अथवा प्रत्यक्ष खर्च (जो कमी असेल तो) एकूण दिवस ७५= **Euro** ९९८०	Euro २९,९४०
दैनिक भत्ता खर्च	$100 प्रति दिवस **Euro** ८९.५० प्रति दिवस अथवा प्रत्यक्ष खर्च (जो कमी असेल तो) एकूण दिवस (७५) ७५ X ८९.५० = **Euro** ६७१२.५०	Euro २०१३७.५०
निवास व टॅक्सी प्रवास खर्चावरील कर (१५%)	१५% (३८३०+९९८०)=**Euro** २०७१.५० (जर्मनीतील करपध्दतीनुसार असलेला कर)	Euro ६२१४.५०
केंद्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार कर	(३८३०+९९८०+२२७१.५०)= १५८८१.५० ३.५% of १५५८८१.५०= **Euro** ५५५.८५ (जर्मनीतील खर्चावर ३.५% कर)	Euro १६६७.५५
एकूण खर्च	**Euro** २३,१४९.८५ + **रु.२,४३,५००/-**	Euro ६९४४९.५५ + रु.७,३०,५००/-